

निडसोशी : निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविले.

# 'देवचंद'च्या विद्यार्थ्यांचा निडसोशीत गौरव

निपाणी, ता. ३० : अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयातील संगणक शास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची संगणक क्षेत्रातील नामंवत क्विक हिल फाउंडेशन संस्थेच्या डिजिटल क्लब ऑफिसरपदी निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांसह २६ सायबर वॉरियर्स विद्यार्थ्यांना निडसोशी गौरविण्यात आले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये हर्षवर्धन जबडे यांच्याकडे अध्यक्ष, समृध्दी भराडे यांच्याकडे सचिवपदाची तर आलोक कांबळे यांच्याकडे माध्यम संचालक म्हणून जबाबदारी देण्यात आली. अर्थव माने यांची कम्युनिटी डायरेक्टर म्हणून निवड झाली. या उपक्रमासाठी प्रा. प्रशांत कुंभार यांची समन्वयक म्हणून निवड झाली. हल्ली डिजीटल युगात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या वाढली असून सायबर गुन्हेगारांची संख्या वाढली आहे. सायबर क्षेत्रातील अपराध्यांच्या शोधासाठी देवचंद महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांची झालेली निवड महाविद्यालयाच्या लौकिकात भर घालणारी आहे. निवड झलेल्या चार विद्यार्थ्यांच्या नेतृत्वात २६ सायबर वॉरियर्स पुढील दोन महिने भागातील शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागृती करणार आहेत.

क्विक हिल फाउंडेशन-पुणे आणि देवचंद महाविद्यालय या संस्थांमध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा : कमवा व शिका' या उपक्रमांतर्गत नुकताच सामंजस्य करार झाला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी. पी. शाह व शिक्षक, विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.